# ‘बर्ड ऑफ गोवा’ पुस्तकाचे प्रकाशन

**पणजी : प्रतिनिधी**

पर्यटनाला चालना देण्यासाठी गोवा पर्यटनने महत्त्वाची मोहीम हाती घेतली असून गोव्यात सापडणाऱ्या पक्ष्यांच्या ४०० जाती व विशिष्ट उपजातींची ४७० छायाचित्रे असलेले ‘बर्ड ऑफ गोवा’ या पुस्तकाचे प्रकाशन गुरुवारी करण्यात आले. या पुस्तकाचे प्रकाशन पर्यटनमंत्री दिलीप परुळेकर यांच्या हस्ते करण्यात आले. पर्यटन खात्याचे संचालक अमेय अभ्यंकर, गोवा पर्यटन विकास महामंडळाचे अध्यक्ष निलेश काब्राल, व्यवस्थापकीय संचालक निखिल देसाई आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.




**पणजी : ‘बर्ड ऑफ गोवा’ पुस्तकाचे प्रकाशन करताना दिलीप परूळेकर, निलेश काब्राल, अमेय अभ्यंकर, निखिल देसाई व इतर. (छाया : समीर नार्वेकर)**

गोव्यातील पक्ष्यांची छायाचित्रासह माहिती या पुस्तकात देण्यात आली आहे. हे पुस्तक विक्रम ग्रेवल यांनी लिहीले आहे. या पुस्तकात पक्ष्यांच्या जातीचे वैशिष्ट्य स्पष्ट करण्यासाठी त्यांची काळजीपूर्वक निवड करण्यात आलेली आहे. या पुस्तकात पक्ष्यांची प्रजाती, आवाज, पिसारा आदी विषयक माहिती देण्यात आली आहे. या पुस्तकात समाविष्ट करण्यात आलेली माहिती पुस्तक प्रेमींसाठी फायदेशीर ठरणार आहे.

पुस्तकात दिलेली चित्रे देश तसेच जगभरातील वाईल्ड लाईफ फोटोग्राफरनी काढलेली आहेत. यातील काही छायाचित्रे निरंजन संत, गुरुराज मूरचिंग, सुमित सेन, क्लेमंट फ्रान्सिस, निखिल देवसर, सर्वदिप सिंग, नितीन श्रीनिवासमुर्ती व रामकी श्रीनिवासन या प्रसिद्ध छायाचित्रकारांनी काढलेली आहेत. गोव्यातील चोर्ला घाट, आल्तीनो, खोतीगाव अभयारण्य, शिरोडा, शिरगाव, मडगाव, बागा, अरोशे बीच, बोंडला अभयारण्य, तांबडी सुर्ला आणि करमळे भागातील आहे. पक्ष्यांच्या प्रत्येक हालचालींचा तपशील यात मांडण्यात आला आहे.